**नियमित दिवाणी दावा क्र.५२४/२०२२**

(शंकर जाधव वि. महादेव जाधव व इतर)

**CNR No.MHSO07-000665-2022**

## निशाणी क्र.२१ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी म्हणणे व कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन म्हणणे व कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादींच्या कथनानुसार, दावा मिळकतीच्या अनुषंगाने महत्वाची कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्याने त्यांना कागदोपत्री माहिती वेळेत त्यांच्या वकिलांना देता आली नसल्यामुळे त्यांना म्हणणे व कैफियत दाखल करणेस विलंब झालेला आहे. त्यामुळे म्हणणे व कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येऊन म्हणणे व कैफियत स्वीकारण्यात यावे अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, सदर अर्ज खरा व कायदेशीर नाही. केवळ दाव्याचे कामकाज लांबवण्यासाठी प्रतिवादींनी कैफियत दाखल करणेस विलंब केलेला आहे. सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. विकल्पेकरुन अर्ज मंजूर करावयाचे झाल्यास जास्तीत जास्त खर्चाची आकारणी करण्याची विनंती केली आहे.

४. प्रकरणाचे अवलोकन केले असता हे स्पष्ट आहे की, प्रतिवादींचे देखील हक्क हितसंबंध दाव्यात गुंतलेले आहेत. त्यामुळे त्यांना त्यांच्या बचावाची संधी देखील मिळणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादींच्या विनंतीनुसार विलंब माफी न दिली गेल्यास आणि त्यांना त्यांचे म्हणणे व कैफियत दाखल करण्याची परवानगी न दिल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होईल. परंतू तशाप्रकारे परवानगी दिली गेल्यास वादीवर कुठलाही अन्याय होत नाही. उलटपक्षी दावा गुणदोषावर निकाली करण्यास त्याची मदतच होते. त्यामुळे खालील आदेशाद्वारे प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यात येत आहे.

### आदेश

१. अर्ज रक्कम रुपये २००/- खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेपर्यंत द्यावी.

३. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी वरीलप्रमाणे खर्चाची पूर्तता केल्यानंतर त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले म्हणणे व कैफियत अभिलेखावर घेण्यात यावे.

Priyanka Namdev Pathade

Digitally signed by Priyanka Namdev Pathade
Date: 2023.10.03 15:53:10 +0530

(पी. एन. पठाडे)

दिनांकः– ०३.१०.२०२३ ४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पंढरपूर

## Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | $4^{th}$ Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 03.10.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 03.10.2023 |
| Judgment/Order uploaded on | - | 03.10.2023 |